# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

CB 10/2026

## प्रेसनोट

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक २३/०२/२०२६

**''वेश्याव्यवसायातुन ०२ अल्पवयीन मुलींची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका''**

..........................................................................................................

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक २०/०२/२०२६ रोजी त्याचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ''नवी मुंबई परिसरात हरिष नावाचा इसम हा ग्राहकांना वेश्यागमनासाठी १६ ते १७ वर्षाच्या मुली पुरवतो. एका मुलीचे १,५०,०००/— रुपये दर फिक्स करुन मुलगी वयाने लहान असल्याने तिला लॉज व हॉटेलमध्ये प्रवेश नसल्याने ग्राहकास हव्या त्याठिकाणी मुलींना सोडतो.''

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकामार्फत दिनांक २०/०२/२०२६ रोजी महिला पुरवणारा इसम हरिष यास संपर्क करुन त्यास मुलींना घेवुन सेक्टर ११, के स्टार हॉटेल समोर येण्याबाबत कळविले. पथकाने सेक्टर ११, के स्टार हॉटेल समोरील जगन्नाथ चांगा कोळी चौक, कुकरेज्या प्लाझा बिल्डिंग समोरील रोडवर छापा कारवाई केली. आरोपी (१) हरिष विकास छारी, वय— २५ वर्षे, व्यवसाय— महिला पुरवणे, रा.रुम नंबर १०३, प्लॉट नंबर ९८६, दिव्याज्योती अपार्टमेन्ट, सेक्टर १९, कोपरखैरणे, नवी मुंबई. (२) पाहीजे आरोपी राज सिंग उर्फ राजा भारत (पुर्ण नाव व पत्ता माहिती नाही) हे वडील असुन सुध्दा त्यांनी २ पिडीत अल्पवयीन मुली (१) अबक, वय— १६ वर्षे (२) अबक, वय— १४ वर्षे, दोन्ही रा.कोपरखैरणे, मुळ रा.राज्य— राज्यस्थान हया वयाने लहान असल्याचे माहिती असताना देखील स्वत:च्या फायदयाकरीता पिडीतांना प्राप्त करुन त्यांचे फोटो आरोपी क्रमांक ०१ यांचे बनावट ग्राहकास दाखवुन वेश्याव्यवसायाचा मोबदला म्हणुन १,५०,०००/— रुपये स्वीकारुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन स्वत:ची उपजिवीका भागवित असताना मिळुन आले. म्हणून त्यांच्या विरूध्द सी.बी.डी. पोलीस ठाणे येथे भा.न्या.सं.कलम १४३ (५), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिंबंधक कायदा कलम १९५६ कलम ४, ५, सह पोस्को कायदा कलम ८, १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. गुन्हयाचा तपास सी.बी.डी. पोलीस ठाणे करत आहे.

**सदर गुन्हयात आरोपी हरिष यास अटक केली असुन त्यांची दिनांक २३/०२/२०२६ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे.**

सदरची कारवाई सहा.पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/पृथ्वीराज घोरपडे, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/२५०१ म्हात्रे, पोहवा/२५०४ अडकमोल, चालक पोहवा/४४४५ हान्डे, चालक पोहवा/मोहिते, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३४५२ कोलते, पोशि/४५४४ पाटील यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★


पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
सहाय्यक पोलीस आयुक्त
व
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष